# स्थानिक स्वराज्य संस्था–महाराष्ट्र राजकारण

डॉ. शरद सांबारे
राज्यशास्त्र विभाग
यशोदा गर्ल्स आर्ट अॅन्ड कामर्स कॉलेज, नागपूर

महाराष्ट्रातील स्थानिक निवडणूक प्रक्रिया व त्यांचे राज्याच्या राजकारणावर झालेले परिणाम यावर फार चर्चा होत नाहि कारण स्थानिक शासनाकडे आपण एक विकासाची बाजु म्हणुनच पाहतो. स्थानिक पातळी वरिल प्रक्रियांचा विचार आपण करीत नाहि या निबंधात तो शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्थानिक शासनाच्या निवडणुका:**

स्थानिक शासनाच्या निवडणुका घेण्यासाठी पूर्वी महाराष्ट्रात स्वतंत्र व्यवस्था नव्हती. 730 व्या घटनादुरूस्तीने ती जबाबदारी राज्यनिवडणुक आयोगावर टाकली आहे. महाराष्ट्रात 1972 साली पंचायत राज्याची मुहुर्तमेढ शेवल्यानंतर पहिली 10 वर्ष नियंत्रीत पद्धातीने निवडणुका झाल्या नंतर त्या आणीबाणीत झाल्या नाहित. 1979 मध्ये शरद पवार मुख्यमंत्री असतांना निवडणुका घेतल्या त्यानंतर 1972 मध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या.

**७३वी व ७४वी घटनादुरूस्ती–रचनात्मक बदल:**

वेळेवर निवडणुका घेणे हे बंधन आले. तसेच विविध आरक्षणे, आर्थिक उत्पन्नाची निश्चीती, वित्त आयोग, निवडणुक आयोग या बाबी आल्या. ७४व्या घटनादुरुस्तीनुसार त्रिस्तरीय शहरी पंचायत राज्याची रचना निर्माण केली. ४२ टक्के लोक शहरी भागात राहतात. नगरपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका अशी त्रिस्तरीय रचना निर्माण झाली. राज्यात शिर्डी आणि दापोली या ठीकाणी नगरपंचायती स्थापन झाल्या. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर जिल्हा परिषदेला जादा अधिकार मिळतील असे वाटत होते परंतु जादा विकेंद्रीकरण करण्याच्या घोषणा देउनही प्रत्यक्षात जिल्हा परिषदेला अधिकार मिळालेले दिसले नाहित.

राखीव जागा धोरणामुळे महाराष्ट्रातील स्थानिक शासनाचा चेहरामोहरा जादा विविधपुर्ण झाला. मराठा जातीचे वर्चस्व कमी झाले. चिठ्ठ्या टाकुण आरक्षण ठरवल्यामुळे आरक्षणाच्या मर्यादा पुढे झाल्या. नागरी शासन व्यवस्थेत पॅनल पध्दती लागु केली. ३–४ वार्ड एकत्र करून ३ उमेदवारांचे पॅनल तयार पे€ले. मतदाराना त्यामुळे ३ नगरसेवक निवडण्याची जबाबदारी आली. यात उमेदवारांची दमछाक हावु लागली. ते राजकीय पक्षांचा पाठिंबा शोधु लागले. त्याबरोबर अपक्षसुद्धा ज्यादा निवडुण येवू लागले. तसेच महिला आराक्षणाचे वार्ड बदलले की स्त्रियांची पंचायत झालेली आढळते.

महाराष्ट्रात नगरपालीकेचा कारभार 1965 च्या कायदयाने चालतो. २००० साली सुधारीत नगरपालिका विधीमंडळ ठरावानुसार नगराध्यक्ष पदाची थेट निवडणुक घ्यायला सुरुवात झाली. आमदाराची चाचपणी सुरु झाली. परंतु नगराध्यक्ष एका पक्षाचा आणि नगरसेवक दुसऱ्या पक्षाचे असे चित्र निर्माण होवून काहि नगरपालीकेत विकासकामे ठप्प झालेली आढळतात.

***स्थानिक निवडणुकांचे निकाल–निरिक्षणे:***

१)राष्ट्रवादी कॉंठोस, कॉंठोस, सेना–भाजप अशा तिरंगी लढती झाल्या. सेना भाजपाला फारसे यश मिळाले नाही.

२)जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत ७०टक्के पेक्षा जास्त मतदान झाले.

३)त्याउलट महानगरपालिका क्षेत्रात कमी मतदान झाले. मुबई ठाणे, उल्हास नगर या महापालिकेत ४० टक्के इतकेच मतदान झाले तर इतर महानगरपालिकेत ५५ ते ६० टक्के मतदान झाले. महानगरपालिका क्षेत्रात काहि प्रमाणात सेना–भाजपा प्रभावी आढळली. निवडणुकीपुर्वी मुंबईच्या महापालिकेत दोन्ही कॉंठोसची युती झाली असती तर जास्त जागा मिळाल्या असत्या असे टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रातुन लक्षात आले. पुण्याची तीच परिस्थीती होती दोन्ही

काँठोस पक्षाची युती नसल्याने सुमारे ५ महानगरपालिकेत कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही. अकोला महानगरपालिकेत मुस्लीमलीगला यश मिळाले तर अहमदनगर महापालिकेत मात्र दोन्ही काँठोस एकत्र येवूनसुद्धा यश मिळाले नाही. काँठोसचे स्थान दुबळे झाल्यामुळे अहमदनगरला शिवसेनेची लोकप्रियता वाढली. भाजपाच्या मदतीने तेथे युती सत्तेवर आली.

४) महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिवसेनेचा शिरकाव झाल्याचे दिसुन आले. कोकणात–शिवसेना, विदर्भात–काँठोस, उत्तर महाराष्ट्रात–भाजपा, पश्चिम महाराष्ट्रात–राष्ट्रवादी काँठोस असे पक्षांच्या प्रभावाचे चित्र असताना मराठवाड्यात या सर्व पक्षांचे बळ सारखे आढळले. राष्ट्रवादी काँठोस सर्व विभागात संतुलित वाटला. शहरी भागामध्ये दोन्ही काँठोस पक्षांनी सेना–भाजपाला धक्का दिला. तसेच ग्रामीण भागात सेना–भाजपाने दोन्ही काँठोसला पर्याय उभा केला.

राष्ट्रवादी काँठोसने 1999 ते 2001 या काळात आपला विस्तार केला. काँठोसला संमिश्र यश मिळाले. शिवसेनेने मात्र आपली पकड कायम ठेवली (मुंबईत उद्धव ठाकरे याच्यामुळे यश मिळाले), भाजपाची मात्र पिछेहाट झाली (राज्यात ४थ्या क्रमांकावर फक्त १० ते १२ टक्के जागा मिळाल्या) अजुनाही भाजपाला महाराष्ट्रात भक्कम पाया निर्माण करता आला नाही. हे यावरुन लक्षात येते.

५) अहमदनगर जिल्हात जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये नविनच प्रकार पुढे आलेला दिसला तो म्हणजे 'निवडणुक फिक्सिंग'. प्रस्थापितांनी एकमेकांना सांभाळण्यासाठी १३ ठिकाणी फिक्सिंग केलेले आढळले.

**महीलांचा सहभाग व सत्तेमुळे आलेले आत्मभान:**

आज महाराष्ट्र पंचायत राज्य व्यवस्थेवर दृष्टीक्षेप टाकला तर पुढील चित्र दिसते. १ लाख ११ हजार स्त्रिया ग्रामपंचायत सभासद आहेत, ६ हजार १७ सरपंच आहेत, १२०० पंचायत समिती सदस्य आहेत, ५८७ जिल्हा परिषद सदस्य आहेत तर ६ ठिकाणी जिल्हापरिषद अध्यक्ष आहेत.

सत्तेमुळे आलेले आत्मभान:

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सत्तेमुळे स्त्रियांना आलेले आत्मभान. गेल्या काहि वर्षात महाराष्ट्रच्या विविध भागांत दारुबंदी विरुद्ध आंदोलने उभी राहिली. बायकांनी मोर्चे काढले. दारुअड्डे उध्वस्त केले, दारु पिणाऱ्यांना दहशत बसावी अशी आंदोलने केली. त्यातील बहुतेक ठिकाणी आंदोलनांचे नेतृत्व तेथील स्त्री पंचाकडेच होते. म्हणजे स्त्रियांनी सत्तेत आल्यानंतर संसारात तापदायक ठरणाऱ्या दारुविरुद्ध प्राधान्याने उठाव केला. सरकारी यंत्रना, पोलिस यंत्रणा आणि गावातील बहुतांश पुरुष मंडळी विरोधात असतांना स्त्रियांनी दारुविध्दची आंदोलने यशस्वी केली.

दुसरा महत्वाचा मुद्दा येतो. स्वच्छता आणि पाण्याचा गावोगावी स्वच्छतागृहे नसल्याने त्याचा सर्वाधिक त्रास स्त्रियांना होत होता. त्यांच्यात पोटांचे विकार वाढीला लागले होते. सत्तेत आलेल्या स्त्रियांच्या विषयपत्रीकेवर स्वच्छता उपलब्धही करुन घेतल्या. पाण्यासाठी स्त्रियांना कुठे कुठे पायपीट करावी लागत होती. मात्र सत्तेत आलेल्या स्त्रियांनी गावात चाव्या बनविण्यास प्राधान्य दिले आणि आपल्या भगिनींचा दु:खभार हलका करण्याचा प्रयत्न केला.

खरेतर या बाबी अगदी प्राथमिक स्वरुपाच्या आहेत. या केल्या म्हणजे फार काहि केले नाहि, असे कुणी म्हणेल ते खरे हि आहे. पण स्त्रिया सत्तेत आल्यानंतर स्त्रियांच्या सोयीच्या छोट्या छोट्या गोष्टीना प्राधान्य मिळाले. ग्रामीण भागात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान यशस्वी होण्यामधे स्त्रियांचा सहभाग फार महत्वाचा आहे.

सर्व सामान्य स्तरातुन आलेल्या स्त्रिया अधिक प्रखरपणे काम करताना दिसतात. दलिन, इतर मागासवर्गीय स्त्रिया प्रतिकुल परिस्थितही हिमतीने काम करत आहेत. याउलट उच्चवर्गीय स्त्रियाच्या कामात त्यांच्या घरची पुरुष मंडळी मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करतात. अनेकठिकाणी स्त्रिया स्वतंत्रपणे कुणाच्याही सल्ल्याशिवाय उत्कृष्ट काम करीत आहेत.

स्त्रियांना आरक्षण देवून १० वर्ष झाली तरी सरकारने त्यांच्या प्रशिक्षणाची कोणतीही ठोस व्यवस्था केलेली नाही. खरे तर या सर्व प्रक्रियेतुन स्त्रियांचे खरे नेतृत्व पुढे यायला पाहिजे होते. मात्र फीरत्या आरक्षणाच्या पद्धतीमुळे एका स्त्रिला दुसऱ्यांदा निवडणुकीला उभी राहण्याची संधी मिळत नाही.

गावपातळीवरील राजकारण गटातटाचे असते. अशावेळी स्त्रिया स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा विचारही करित नाही. त्यामुळे यातुन नेतृत्व विकसीत होवू शकत नाही. या त्रुटी दुर झाल्या पाहिजेत. आरक्षणानंतरच्या दुसऱ्या दशकात त्याला प्राधान्य दिले पाहिजे.

***संदर्भ सूची :***

१) डॉ. सुहास पळशीकर, नितीन बिरमल, महाराष्ट्राचे राजकारण (राजकीय प्रक्रीयेचे स्थानिक संदर्भ) प्रतिमा प्रकाशन, पुणे, जानेवारी २००४
२) डॉ. व्होरा आणि डॉ. पळशीकर, महाराष्ट्रातील सत्तावर, मुबई, ठांथाली 1986
३) टाईम्स ऑफ इंडीया, पुणे १३ फब्रुवारी २००२
४) मुंबई प्रातिक महापालिका अधिनियम १९४८ (२००३ सुधारीत आवृत्ती)
५) डॉ. बाळ कांबळे, डॉ. गिरीश कुलकर्णी अहमदनगर जिल्हातील स्थानिक शासन निवडणुक २००२ (संशोधनपर लेख) महाराष्ट्राचे राजकारण, प्रतिमा प्रकाशन–पुणे, २००४
६) दैनिक सकाळ – लेख – स्त्री सत्तेची दशकपुर्ती २७ एप्रील २००३